# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग /
कला निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८

क्र. परीक्षा/कला निकाल कक्ष/३७५०-अ/२०१७

**परिपत्रक :–**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांचे क्र.परिक्षा/कला निकाल कक्ष/३७५०/२०१७ दि. २७ जानेवारी, २०१७ रोजीच्या परिपत्रका कडे लक्षवेधून या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, काही तांत्रिक अडचणीमुळे मार्च, २०१७ (प्रथम सत्र २०१७) मध्ये घेण्यात येणा–या कला शाखेच्या फक्त B.M.M. (CBSGS) (75:25) (Sem. V & VI) (Fresh & Repeater) शिक्षणाक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in/portal या वेब लिंक वरून online घेण्यात येणार आहे. तसेच B.Ed. (CBSGS) (2 Years Cource) (SEM-II & IV) व M.A. (CBCS) (Sem.II) (Fresh) या शिक्षण क्रमांचे परिक्षा प्रवेश अर्ज भरण्याच्या तारखा नंतर कळविण्यात येणार आहेत यांची कृपया नोंद घ्यावी.

B.M.M. (CBSGS) (75:25) (Sem. V & VI) (Fresh & Repeater) या अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in/portal →Exam & Results →examination → Follow the instruction given on the page या वेब लिंक वरून online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.:–

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने online अर्ज भरण्याची, Inward करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | महाविद्यालयाने form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | ०३/०२/१७ ते १६/०२/१७ | १८/०२/१७ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/– सहित | १७/०२/१७ ते ०१/०३/१७ | ०३/०३/१७ पर्यंत |
| ३. | अतिविलंब शुल्क रू. ५००/– सहित | ०२/०३/१७ ते ०८/०३/१७ | १०/०३/१७ पर्यंत |

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे–संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in/portal या संकेतस्थळावर online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी online भरलेले परीक्षाअर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाचे form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा अर्जाच्या प्रती (Examination form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

**परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (१०/०३/२०१७ रोजी सायं. ६ वा.) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करणापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

...२/–

# मुंबई विद्यापीठ



जे विद्यार्थी द्वितीय सत्र २०१६ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण आहेत व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१७ मध्ये होणा—या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच उपरोक्त तारखांप्रमाणे भरावेत.

**एखादया विद्यार्थ्याचे परीक्षा प्रवेश अर्ज तांत्रिक कारणास्तव online पध्दतीने Inward होत नसेल तसेच श्रेणी सुधारण्यासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज व Sem-I to Sem-VI पर्यंतच्या सर्व गुणपत्रिकांच्या छायाकिंत प्रती सोबत पारंपारीक पद्धतीने ( Hard Copy स्वरुपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरुन विद्यापीठाकडे पाठवावेत.**

तसेच B.M.M. (Sem VI) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कामध्ये रु. २५०/— पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठीत (देवनागरी लिंपीत) नाव टाकणे बंधनकारक आहे, हे नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. त्यामुळे नावांत चुक होणार नाही याची दक्षता संबंधीतांनी घ्यावी.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधितांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.
(Web Link :- mu.ac.in/portal → Exam & Results → examination → follow the instructions given on the page)

**Note :- B.Ed. (CBSGS) (2 Years Cource) (SEM-I, II, III & IV) व M.A. (Sem.I, II, III & IV) च्या परिक्षा प्रवेश अर्ज भरण्याच्या तारखा नंतर कळविण्यात येतील.**

स्थळ : मुंबई.
दि. ३१जानेवारी, २०१७

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक
अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र
४.

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई—३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक